# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठाचे उत्कृष्ट सेवागौरव पुरस्कार जाहीर**
**नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालयाची निवड**
**१ मे रोजी पुरस्कार वितरण समारंभ**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने दि. १ मे, २०१८ रोजी उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार प्रदान केल्या जाणार आहे. विद्यापीठ स्तर, संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था स्तर आणि नाविन्यपूर्ण उपक्रम अशा वर्गवारीत हे पुरस्कार प्रदान केले जातील.

विद्यापीठ स्तरावरील उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार शिक्षक संवर्गात विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील सहा. प्राध्यापक तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाचे समन्वयक डॉ. गजानन घनश्याम मुळे यांना, द्वितीय श्रेणी अधिकारी वर्गवारीत अभियांत्रिकी विभागाचे मालमत्ता अधिकारी श्री राजेश वसंतराव उपाध्ये यांना, तृतीय श्रेणी कर्मचारी वर्गवारीत परीक्षा विभागातील वरिष्ठ सहाय्यक श्री मनोहर तुकारामजी डोळस व चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गवारीत महाविद्यालयीन विभागातील शिपाई श्री भारतसिंह रघुनाथसिंह ठाकूर यांना पुरस्कार घोषित झाला असून प्रथम श्रेणी अधिकारी वर्गवारीत कोणाचाही अर्ज नसल्यामुळे पुरस्कार घोषित करण्यात आला नाही.

संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक स्तरावरील उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार संवर्गात प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट, बडनेराचे प्राचार्य डॉ. मिर सादिक अली यांना, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक संवर्गात श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. अर्चना देविदास बोबडे यांना, संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी संवर्गात लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी, जि. यवतमाळचे कनिष्ठ लिपीक श्री विजय शंकरराव उपाध्ये यांना घोषित झाला आहे, तर नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी वाशिम जिल्ह्यातील कारंजा (लाड) येथील श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालयाची निवड झाली असून डॉ. सुभाष गवई हे या महाविद्यालयाचे प्राचार्य आहेत.

उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारप्राप्त सर्व प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर व कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी अभिनंदन केले असून त्या सर्वांनी दि. १ मे, २०१८ रोजी सकाळी ७.३० वाजता विद्यापीठाच्या डॉ.के.जी. देशमुख सभागृहात आयोजित सत्कार कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

सोबत फोटो पाठविण्यात येत आहे :- १) डॉ. गजानन मुळे, २) श्री राजेश उपाध्ये, ३) श्री मनोहर डोळस, ४) श्री भारतसिंह ठाकूर, ५) प्राचार्य डॉ. मिर सादिक अली, ६) डॉ. अर्चना बोबडे, ६) श्री विजय उपाध्ये, ८) प्राचार्य डॉ. सुभाष गवई.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**
दि. २५/०४/२०१८.

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी